लोकमत

# मेट्रो-३चे ९५ टक्के झाले भुयारीकरण

## कफ परेड ते सीएसएमटीपर्यंतचे काम पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : ऐतिहासिक वारसा इमारतीजवळील मेट्रो-३ च्या पॅकेज-१ चे ९५ टक्के भुयारीकरण मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे पूर्ण करण्यात आले. या पॅकेजअंतर्गत भुयारीकरणाचा ३७ वा टप्पा पार पडला.

### पॅकेज-१

- कफ परेड ते विधान भवन
- विधान भवन ते चर्चगेट
- चर्चगेट ते हुतात्मा चौक
- हुतात्मा चौक ते सीएसएमटी

हुतात्मा चौक ते सीएसएमटी हा डाउनलाइन मार्गाचा ५६९ मीटर भुयारीकरणाचा टप्पा एकूण ४१८ रिंग्जच्या साहाय्याने १०६ दिवसांत पूर्ण झाला.

या भुयारीकरणासह पॅकेज-१ मधील कफ परेड ते सीएसएमटी दरम्यान एकूण २.९ किमी लांबीचे डाउनलाइनचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे. सूर्या-२ या टनेल बोअरिंग मशीनद्वारे हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे.




ऐतिहासिक वारसा इमारती व समुद्रानजीक भुयारीकरण करणे जिकिरीचे आहे. पॅकेज-१ चे आतापर्यंत ९६ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले, असे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी सांगितले. पॅकेज-१ अंतर्गत कफ परेड, विधान भवन, चर्च गेट आणि हुतात्मा चौक या मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. या पॅकेज अंतर्गत भुयारीकरणाचे सहा टप्पे पूर्ण झाले. तर मेट्रो-३ प्रकल्पासाठी आतापर्यंत एकूण ९५ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे.